ठाणे, मंगळवार दि. ६ ऑगस्ट २०२४ वर्ष : १३, अंक : ९९ पाने : ४, किंमत : २ रुपये
Maharashtra Samrat | Maharashtra Samrat | dainikmahasamrat@gmail.com | Reg. No. THC/58/2024-2026

वर्धापनदिन
१३ वर्षांची यशस्वी घोडदौड

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच !®

# दैनिक महाराष्ट्र सम्राट

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर आणि पुणे येथून प्रसिद्ध
संपादक : चंद्रकांत भोईटे

अग्रलेख
**मराठी भाषा संवर्धनाची गरज**
भारताला भाषांची प्राचीन परंपरा आहे. देशात विविध जाती-जमाती आहेत. त्यांच्या बोलीभाषाही वेगवेगळ्या आहेत. बोलीभाषा म्हणजे प्रत्येक समाजाची सांस्कृतिक ओळख आहे. .......पान २ वर

भाजपच्या बेलापुरात नाईकांचा 'सांगली पॅटर्न'? वाढदिवसानिमित्त संदीप नाईकांचे जोरदार शक्तिप्रदर्शन ...पान ४ वर

# लाडकी बहीण योजनेला दिलेले आव्हान मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळले

**पहिल्या हप्त्याचा मार्ग मोकळा**

"योजना ही सरकारनं बजेटच्या अंतर्गत घेतलेला निर्णय, त्याला आव्हान कसं देता येईल? – न्यायालयाचा थेट सवाल"

**मुंबई: आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारची महत्वाकांक्षी योजना मानल्या जाणाऱ्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या पहिल्या हप्त्याचा मार्ग मोकळा झाला आहे. लाडकी बहीण योजनेला दिलेलं आव्हान मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळलं आहे. सरकारच्या धोरणात हस्तक्षेप करण्यास कोर्टाने नकार दिला आहे. त्यामुळे राज्य सरकारला मोठा दिलासा मिळाला असून १४ ऑगस्टला सरकारी तिजोरीतून जाणाऱ्या पहिल्या हफ्त्याचा मार्ग मोकळा झाला आहे.**

मुंबई उच्च न्यायालयात लाडकी बहीण योजनेविरोधात याचिका दाखल करण्यात आली होती. या याचिकेत १४ ऑगस्टला वितरीत करण्यात येणारा मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा पहिला हप्ता थांबवण्याची मागणी करण्यात आली होती. काल मुंबई उच्च न्यायालयात मंगळवारी या याचिकेवर तातडीची सुनावणी झाली. या सुनावणीत सरकारी धोरणात हस्तक्षेप करण्यास नकार दिला आहे.



### मुंबई उच्च न्यायालयाचा याचिकाकर्त्यांना सवाल

कर भरतो म्हणून सुविधा द्या, अशी मागणी करता येत नाही. 'फी' आणि 'कर' यात फरक आहे. लाडकी बहीण योजना ही सरकारनं बजेटच्या अंतर्गत घेतलेला निर्णय, त्याला आव्हान कसं देता येईल? असा थेट सवाल मुंबई उच्च न्यायालयाने याचिकाकर्त्यांना केला आहे. नवी मुंबईतील नावेद मुल्ला यांनी ही याचिका न्यायालयात दाखल केली होती.

### मुख्य न्यायमूर्तींच्या खंडपीठाकडून याचिकाकर्त्यांची कानउघडणी

तुम्हाला वाटलं म्हणून अशा पद्धतीनं सर्वसामान्यांच्या हिताचा मुद्दा पुढे करत धोरणात्मक निर्णयाला आव्हान देता येणार नाही, असे म्हणत मुख्य न्यायमूर्तींच्या खंडपीठाने याचिकाकर्त्यांची कानउघडणी केली. योजना समाजातील आर्थिक दुर्बल घटकांना विचारात घेऊन आखल्याचा राज्य सरकारने कोर्टात दावा केला.

### काय होती याचिका?

लाडकी बहीण योजना म्हणजे करदात्यांच्या पैशांचा अपव्यय आहे. विधानसभा निवडणूक डोळ्यांसमोर ठेवून राज्य सरकारने ही योजना सुरु केली आहे. ही भ्रष्ट कृती असून हा मतदारांना आमिष दाखवण्याचा प्रकार आहे. निवडणुकीत पैसे वाटल्यास निवडणूक आयोगाकडून कारवाई केली जाते. मात्र, सध्या विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू नसल्यामुळे निवडणूक आयोग कारवाई करु शकत नाही, असे याचिकाकर्त्यांनी म्हटले होते.

# बदलापूरमध्ये रासायनिक कंपनीत मोठा स्फोट

- **रिऍक्टर आणि रिसिव्हरच्या स्फोटामुळे संपूर्ण कंपनी बेचिराख**
- **स्फोटातील रिसिव्हर उडून ४०० मीटर अंतरावरील चाळीवर पडला**

**बदलापूर : बदलापूरच्या माणकिवली एमआयडीसीत रासायनिक कंपनीत मोठा स्फोट झाला असून यात संपूर्ण कंपनी जळून खाक झाली आहे. हा स्फोट इतका भीषण होता, की रिऍक्टरचा रिसिव्हर उडून तब्बल ४०० मीटर लांब असलेल्या एका चाळीवर जाऊन कोसळला. यात चाळीत राहणाऱ्या कुटुंबातील लहान मुलीसह तिघे जखमी झाले आहेत. सुदैवाने कंपनीतील कोणत्याही कामगाराला मात्र इजा झालेली नाही.**

बदलापूरच्या माणकिवली एमआयडीसीत रेअर फार्मा नावाची कंपनी असून त्यात केमिकल्स उत्पादन केलं जातं. आज पहाटे ४.३० वाजताच्या सुमारास कंपनीत रिऍक्टरमध्ये प्रक्रिया सुरू असताना अचानक रिसिव्हरमध्ये स्फोट झाला. यानंतर तिथेच असलेल्या मिथेनॉल या ज्वलनशील पदार्थांच्या ड्रम्सने सुद्धा पेट घेतला. त्यामुळे संपूर्ण कंपनी आगीत भस्मसात झाली.

हा स्फोट इतका भीषण होता की रिऍक्टर सोबत असलेला रिसिव्हर उडून माणकिवली गावातील एका चाळीवर जाऊन कोसळला. या चाळीतील एका कुटुंबातले पुरुष महिला आणि लहान मुलगी असे तिघे या घटनेत जखमी झाले असून यापैकी दोघांना मुंबईच्या केईएम हॉस्पिटलमध्ये पाठवण्यात आलंय, तर एकावर बदलापूरमध्येच उपचार सुरू असल्याची माहिती अग्निशमन अधिकारी भागवत सोनोने यांनी दिली आहे.



### बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना यांचा राजीनामा, बहिणीसह देश सोडून अज्ञातस्थळी रवाना



बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना यांनी राजीनामा दिला आहे. गेल्या काही दिवसांपासून बांगलादेशात आरक्षणाच्या मुद्द्यावरुन प्रचंड हिंसाचार सुरु आहे. त्याच पार्श्वभूमीवर शेख हसीना यांनी राजीनामा देऊन, त्या सुरक्षित पण अज्ञात स्थळी रवाना झाल्या. शेख हसीना आणि त्यांच्या बहिणीनं देश सोडला असून त्या दोघीही सुरक्षित स्थळी निघून गेल्या आहेत. बांगलादेशात सध्या अस्थिर वातावरण आहे. यामुळेच त्यांनी बांगलादेश सोडून सुरक्षित स्थळी (पान २ वर)

- **बांग्लादेशचे लष्कर आता अंतरिम सरकार स्थापन करणार...**

# कल्याण स्टेशनवर राडा

## सुट्ट्या पैशांवरून रेल्वे स्टाफची प्रवाशाला बेदम मारहाण

**कल्याण – पावसामुळे मध्य रेल्वेच्या लोकल सेवेवर नेहमी परिणाम होत असतो. त्यामुळे कामावर निघालेल्या प्रवाशांना मोठा मनस्ताप सहन करावा लागतो, त्यातच लोकलची गर्दी, चेंगराचेंगरी यामुळे देखील प्रवासी हवालदिल झालेले असतात. पण आता हे सर्व कमी की काय म्हणून प्रवाशांना चक्क रेल्वे कर्मचाऱ्यांकडून मारहाण करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. मध्य रेल्वेवरील महत्वाचे स्थानक असलेल्या कल्याण स्टेशनवर ही खळबळजनक घटना घडली असून तिकीट काऊंटरवरील महिला स्टाफने चक्क एक महिला प्रवाशाला स्टाफने मारहाण केल्याचा अतिशय खळबळजनक प्रकार घडल्याचे समोर आले आहे.** (पान २ वर)









# वाढदिवसानिमित्त 'एक झाड आईसाठी' महा वृक्षारोपण

पनवेल (प्रतिनिधी) - समाजप्रिय नेतृत्व असलेले कार्यसम्राट व लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त काल (०५ ऑगस्ट रोजी) विविध समाजोपयोगी उपक्रम आयोजित करण्यात आले होते. त्यानुसार मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण, ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार सोहळा, महिलांना कर्करोग प्रतिबंधक लस, भजन स्वरपुष्प, क्रीडा स्पर्धा, शालेय साहित्य वाटप, अशी विविध सामाजिक कार्यक्रमे मोठ्या उत्साहात साजरे झाले. तत्पूर्वी आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपले वडील लोकनेते रामशेठ ठाकूर व आई शकुंतला ठाकूर यांचे आशिर्वाद घेतले. वाढदिवसानिमित्त राज्यातील नेते मंडळींसह, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक, विधी, वैद्यकीय, पत्रकारिता, अशा विविध क्षेत्रातील मान्यवरांसह विविध संस्था, संघटना, पदाधिकारी, कार्यकर्ते, हितचिंतकांनी त्यांचे अभिष्टचिंतन केले.

देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेनुसार 'एक झाड आई साठी' हा उपक्रम देशभर राबविला जात आहे, त्या अनुषंगाने कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या वाढदिवसाचे औचित्य साधून केलेल्या आवाहनानुसार आयोजित कार्यक्रमात हजारो वृक्षांचे रोपण करण्यात आले. एखाद्या कार्यक्रमात वृक्ष भेट दिल्याने त्या कार्यक्रमाचे स्वरूप बदलून जाते त्याचप्रमाणे वृक्षारोपण आणि त्याचे संवर्धन केल्याने मानवी जीवनास अनुकूल असे वातावरण निर्माण होते. यंदाच्या उन्हाळ्यात ४० डिग्री पेक्षा जास्त तापमान सर्वांना अनुभवायला मिळाला आहे, याची पुनरावृत्ती होण्यापेक्षा आपण वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धन यावर भर देण्याची गरज आहे आणि या अनुषंगाने आमदार प्रशांत ठाकूर यांच्या आवाहनानुसार पनवेल तालुक्यातील आंबिवली (नेरे) येथे जवळपास ०२ हजार वृक्षांचे रोपण करण्यात आले आणि त्याचे संवर्धन करण्याची जबाबदारी पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या कोशिश फाऊंडेशन या सेवाभावी संस्थेने घेतली आहे. वाढते औद्योगिकीकरण, इमारतींचे पसरणारे जाळे, अमर्याद वृक्षतोड यामुळे निसर्गाची मोठी हानी होत आहे. त्याचा परिणाम पर्जन्यवृष्टीवर होत असल्याने अवकाळी पाऊस, ओला दुष्काळ, कोरडा दुष्काळ, पिकांची नासाडी, भूकंप, महापूर, अनियमित ऋतुमान, वाढते प्रदूषण अशा विविध समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. मात्र आपण पाऊस आणि निसर्गाला दोष देऊन मोकळे होतो, पण मानव म्हणून निसर्गाचे रक्षण करणे ही आपली जबाबदारी आहे. त्यामुळे सामाजिक बांधिलकी जपण्याचे काम करतानाच वृक्षरोपण व वृक्ष संवर्धन असा उपक्रम या निमित्ताने राबविण्यात आला.



## ज्येष्ठांचे आशीर्वाद माझ्यासाठी बहुमोल - आमदार प्रशांत ठाकूर

चंदनाप्रमाणे झिजून ज्येष्ठांनी आपले आयुष्य कुटूंब व समाजासाठी वेचले आहे, त्यांच्या अमूल्य मार्गदर्शनातून समाज घडत आहे, त्यामुळे ज्येष्ठांचे आशीर्वाद माझ्यासाठी बहुमोल आहेत, असे प्रतिपादन लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांनी खारघर येथे केले.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त 'खारघरचा राजा' संस्थेच्यावतीने ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार सोहळा छत्री वाटप तसेच ज्येष्ठ महिलांना साडी व ज्येष्ठ पुरुषांना शर्ट व पॅन्टपीस वाटप करण्यात आले.

## सर्वाइकल कॅन्सर प्रतिबंधात्मक लसीकरण शिबीर

कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, रायगड जिल्हा उत्तर भारतीय मोर्चा, नमो नमो मोर्चा, पंडित पारसनाथ शर्मा चॅरिटेबल ट्रस्ट आणि सखी वुमन वेल्फेअर यांच्या संयुक्त विद्यमाने खारघर येथे ९ ते १८ वयोगटातील मुलींसाठी सर्वाइकल कॅन्सर प्रतिबंधात्मक लसीकरण शिबीर पार पडले.

# संपादकीय...



संपादक-चंद्रकांत भोईटे

## मराठी भाषा संवर्धनाची गरज

भारताला भाषांची प्राचीन परंपरा आहे. देशात विविध जाती-जमाती आहेत. त्यांच्या बोलीभाषाही वेगवेगळ्या आहेत. बोलीभाषा म्हणजे प्रत्येक समाजाची सांस्कृतिक ओळख आहे. ही सांस्कृतिक ओळख आज जागतिकीकरणाच्या युगात अस्तंगत होत आहे की काय अशी परिस्थिती आहे. प्रत्येक समाजाने आपली बोलीभाषा समृद्ध करण्याचा व जतन करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. जागतिकीकरणात इंग्लिश भाषेला मोठे महत्व आले असून लोक प्रादेशिक भाषेचा वापर करताना इंग्लिश भाषेतील शब्द वापरत आहेत. तर काही स्थानिक भाषा न्युनगंडामुळे लोक बोलण्यास धजत नाहीत. बोलीभाषा लिखित असण्याचे प्रयत्न खूप कमी प्रमाणात होत आहेत. भाषेला प्रतिष्ठा प्राप्त करून द्यायची असेल तर ती नेहमीच वापरात पाहिजे. मराठी भाषेत अनेक प्रयोग होत आहेत. तसेच मराठी भाषेमध्ये अनेक बोलीभाषा अस्तित्वात आहेत. या बोलीभाषांचे संवर्धन केले तर मराठी आपोआपच समृद्ध होईल असे वाटते. त्यामुळे नागरिकांनी मराठी भाषा व बोलीभाषा जपली पाहिजे. भाषेचा प्रसार करायचा तर त्यासाठी उत्कृष्ट साहित्याची निर्मिती करण्यासाठी स्थानिक लेखक, साहित्यिकांना प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. महाराष्ट्रातील उदाहरण घेऊ. सिंधुदुर्ग जिल्ह्यात स्थानिक लोक मालवणी भाषा सर्रास बोलतात, पण ही भाषा लिखित स्वरुपात जोवर बाहेर सर्वत्र पोहोचत नाही, तोपर्यंत या भाषेचा गोडवा, स्थानिक संस्कृती इतरांना समजणार नाही. मुंबई, ठाणे, पालघर पटट्यात आगरी भाषा बोलली जाते. या भाषेची ओळख लोकांना होत आहे. प्रत्येक भाषेला सौंदर्य आहे, ताल आहे. परंतु भाषा संवर्धन झाले पाहिजे. जाणकार लोकांनी या भाषा टिकविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. अनेक वृत्तपत्रांत काही बोली भाषांतील सदरे वाचनीय आहेत. प्रादेशिक भाषेसाठी राज्य सरकार प्रयत्न करते, पण बोलीभाषेची जपणूक करणे हे प्रत्येकाचे काम आहे. १९६१ च्या जनगणनेनुसार, भारतात १६५२ भाषा अस्तित्वात होत्या. द पीपल लिंग्विस्टिक सर्व्हे ऑफ इंडियाने केलेल्या अभ्यासानुसार, २०१० मध्ये देशात ७८० भाषा होत्या. यापैकी १९७ भाषांचे अस्तित्व धोक्यात आहे तर ४२ भाषा नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. पूर्वांचलात अरुणाचल प्रदेश आणि आसाम, पश्चिम प्रांतात महाराष्ट्र आणि गुजरात, पूर्व भागात ओरिसा आणि बंगाल तर उत्तरेकडे राजस्थानमध्ये सर्वाधिक प्रादेशिक भाषा बोलल्या जातात. देशात वापरात असलेल्या ६८ लिपी आहेत. भारतात ३५ भाषांमध्ये वृत्तपत्रे प्रकाशित होतात. हिंदी ही भारतात सर्वाधिक (४० टक्के) लोकांची बोली भाषा आहे. त्यानंतर बंगाली (८ टक्के), तेलुगू (७.१ टक्के), मराठी (६.९ टक्के) आणि तामीळ (५.९ टक्के) या भाषा अनुक्रमे बोलल्या जातात. सरकारतर्फे चालवले जाणारे ऑल इंडिया रेडिओ अर्थात आकाशवाणी १२० भाषांमध्ये कार्यक्रम प्रसारित करते. भारताच्या संसदेत देशभरातल्या भाषांपैकी केवळ ४ टक्के भाषांचे प्रतिनिधित्व होते. महाराष्ट्राच्या पश्चिम किनाऱ्यावर मुंबईपासून जवळ असलेल्या काही गावांमध्ये कालबाह्य ठरलेली पोर्तुगीज भाषा बोलली जाते. भारताचा अविभाज्य भाग असलेल्या अंदमान आणि निकोबार बेटांवर करेन भाषा बोलली जाते. ऐतिहासिक वारसा लाभलेली ही भाषा प्रत्यक्षात म्यानमारची आहे. गुजरातमधल्या काही गावांमध्ये चक्क जपानी भाषा बोलली जाते. भारतात तब्बल १२५ विदेशी भाषा मातृभाषा म्हणून अस्तित्वात आहेत. गुजरात राज्यातील विद्यापीठात डॉ. गणेश देवी नावाच्या इंग्रजी विषयाच्या प्राध्यापकांनी भाषा या विषयावर २३ वर्ष काम केले. त्यांनी जवळच्या आदिवासी क्षेत्रात काम करण्याचा निर्णय घेतला. आदिवासींच्या अकरा भाषांमध्ये ते नियतकालिके प्रसिद्ध करतात. भारतीय भाषांचे उद्गाते गणेश देवी पेशाने इंग्रजी प्राध्यापक, पण देवी यांना भारतीय भाषांबद्दल प्रेम आहे. या प्रेरणेतून त्यांनी भाषांचा अभ्यास करायला सुरुवात केली. त्यांनी तब्बल ७८० भाषांचा अभ्यास केला. देवी यांच्या संशोधनामुळे असंख्य देशी भाषा अस्तित्वासाठी संघर्ष करत असल्याचे स्पष्ट झाले. नामशेष होत जाणाऱ्या या भाषांच्या दस्तावेज संवर्धनाचे काम त्यांनी हाती घेतले. हिमाचल प्रदेश राज्यात बोलल्या जाणाऱ्या १६ भाषा त्यांनी शोधून काढल्या. राजस्थानात इंग्रजांनी गुन्हेगारी जमाती म्हणून बदनाम केलेल्या प्रजातींची मंडळी गुप्त स्वरुपाची भाषा बोलतात,हेही त्यांनी शोधून काढले. काही वर्षांपूर्वी डॉ. देवी यांनी पीपल्स लिंग्विस्टिक सर्व्हे ऑफ इंडिया प्रकल्पाची मुहुर्तमेढ रोवली. देशातली माणसे जी प्रादेशिक भाषा बोलतात त्याचा अभ्यास करण्यासाठी हा प्रकल्प आहे. देवींनी भारत पिंजून काढला. भाषांचा सखोल अभ्यास करण्यासाठी ते अनेक राज्यांत फिरले. या कामात त्यांना त्यांच्या सहकाऱ्यांची व ३५०० जणांची फौज त्यांनी उभारली. १९६१ च्या जनगणनेनुसार १६५२ भाषांची नोंद करण्यात आली होती. २०११ मध्ये डॉ. देवी यांच्या प्रकल्पामुळे भारतात केवळ ७८० भाषाच शिल्लक राहिल्याचे स्पष्ट झाले. संघटनेचे सर्वेक्षण आणि तपशीलवार अभ्यास मांडणाऱ्या १०० पुस्तकांपैकी ३९ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. तुटपुंजा सरकारी पाठिंबा, विशिष्ट भाषा बोलणाऱ्या व्यक्तींची कमी होणारी संख्या, स्थानिक भाषेत मिळणारे निकृष्ट दर्जाचे प्राथमिक शिक्षण तसेच जातीजमातींचे त्यांच्या मूळगावाहून होणारे स्थलांतर अशा विविध गोष्टींमुळे भाषा लयाला जात आहे.भाषा लुप्त होण्याने संस्कृती, खरा इतिहास नामशेष होतो. जागतिकीकरणाच्या काळात भाषा मृत्यूपंथाला लागणे वाईट आहे. आपल्या अनेक भाषा काटेकोरपणे टिकल्या आहेत. प्रादेशिक भाषा जपणे हे स्थानिक लोकांच्या हातात आहे. स्थानिक भाषेतील साहित्यनिर्मिती प्रादेशिक भाषांचा होणारा लय थांबवू शकते. म्हणून प्रादेशिक भाषेचे संवर्धन महत्वाचे आहे. आज मराठी भाषेला मराठी भाषिकांकडून दुर्लक्षित केले जात आहे ही बाब योग्य नाही. मराठी भाषा समृद्ध झाली पाहिजे आणि मराठीतील बोली भाषांना महत्त्व दिले गेले पाहिजे. तरच मराठी भाषेला अभिजात म्हणून तिला दर्जा मिळू शकेल. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळणे ही मराठी भाषिकांची जबाबदारी आहे असे वाटते.

# मुलुंड येथील जी. व्ही. स्कीम मनपा गुजराती शाळेत बस सेवा सुरू



मुंबई- शाळा सुरू झाल्यापासून आजतागायत मुलुंड येथील जी. व्ही. स्कीम मनपा गुजराती शाळेत बस सेवा सुरू न झाल्यामुळे दूरवरून येणाऱ्या विद्यार्थ्यांना रोज पायपीट करीत शाळेत यावे लागते. त्यांची ही अडचण लक्षात घेता पालकांनी एकत्र येत दै. महाराष्ट्र सम्राटचे पत्रकार महेंद्रकुमार राजगोर यांच्याशी संपर्क केला. पत्रकार महेंद्रकुमार राजगोर यांनी सुध्दा पालकांनी अडचण समजून त्यांना मदत करण्याचे ठरविले. पालकांच्या समस्या सोडविण्यासाठी पत्रकार राजगोर मनपा टी वॉर्ड ऑफिसमधील शालेय प्रशासकीय अधिकारी आर्य यांच्याशी भेट धेतली व पालकांची कौफियत मांडली. अधिकारी आर्य यांच्यासोबत सविस्तर चर्चा करून हा प्रश्न सोडविण्यासाठी विनंती केली. अधिकारी आर्य यांनी ही समस्या दोन ते तीन दिवसात शालेय बस सुरू करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

### पालकांमध्ये आनंदाचे वातावरण

पत्रकार महेंद्रकुमार राजगोर यांच्या प्रयत्नांना अखेर यश आले व शाळेत विद्यार्थ्यांना ने-आण करण्यासाठी शालेय बस सुरू झाली. त्यामुळे पालकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. तसेच पत्रकार राजगोर यांचे सर्व पालकांनी आभार मानले.

# बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना यांचा राजीनामा, बहिणीसह देश सोडून अज्ञातस्थळी रवाना

**(पान १ वरून)** गेल्याची माहिती मिळत आहे. मागच्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या आंदोलनामुळे बांगलादेशात मोठा हिंसाचार सुरू आहे. पंतप्रधान शेख हसीना भारताच्या दिशेनं रवाना झाल्याची माहिती मिळत आहे.

बांगलादेशात जुलै महिन्यापासून विद्यार्थ्यांनी आंदोलन सुरु केलं होतं. सरकारी नोकरीत सध्या असलेला आरक्षणाचा कोटा रद्द करावा, अशी या विद्यार्थ्यांची मागणी होती. या आंदोलनानंतर शेख हसीना सरकारने काही कोटा कमी केला, मात्र तरीही आक्रमक आंदोलकांनी शेख हसीना यांच्या राजीनाम्याची मागणी लावून धरली होती. विद्यार्थ्यांच्या हिंसक आंदोलनात आतापर्यंत ३०० पेक्षा जास्त नागरिकांचा मृत्यू झाला.

मागील अनेक दिवसांपासून बांगलादेशात आरक्षणावरुन वादंग सुरु आहे. शासकीय नोकरीत मिळणाऱ्या आरक्षणाच्या मुद्द्यावरून सध्या बांगलादेशमध्ये हे आंदोलन चालू आहे. १९७१ साली बांगलादेशची निर्मिती झाली. या लढ्यात ज्या लोकांनी आपले योगदान दिलेले आहे, त्यांच्या वंशजांना मिळत असलेले आरक्षण कायम राहावे, असे आंदोलकर्त्यांचे मत आहे. तर हे आरक्षण आता बंद करावे, असे दुसऱ्या एका गटाचे मत आहे.

■ **बांगलादेशचे लष्कर आता अंतरिम सरकार स्थापन करणार** - शेख हसीना यांनी राजीनामा दिल्यानंतर देशाची कमान आता लष्कराच्या हाती आली आहे. बांगलादेशच्या लष्कराने पंतप्रधान शेख हसीना यांना राजीनामा देण्यासाठी ४५ मिनिटांचा अल्टिमेटम दिला होता. त्यानंतर शेख हसीना यांनी राजीनामा दिला आणि देश सोडला. त्यामुळे बांग्लादेशचे लष्कर आता अंतरिम सरकार स्थापन करणार आहे.

# कल्याण स्टेशनवर राडा

**(पान १ वरून)** या घटनेचा व्हिडीओही व्हायरल झाला असून संबंधित प्रवासी महिला जखमी झाली आहे.

सुट्ट्या पैशांच्या शुल्लक मुद्यावरून झालेल्या वादाला एवढे भयानक वळण लागेल याची कोणीही कल्पनाच केली नव्हती. यामध्ये संबंधित प्रवासी महिला जखमी झाली असून मारहाणीमुळे तिला मोठा मानसिक धक्काही बसला आहे. य़ा खळबळजनक घटनेटा व्हिडीओ देखील समोर आला असून स्टाफमधील ती महिला अरेरावी करत वाद घालत असल्याचेही त्यात दिसत आहे. यामुळे प्रवाशांमध्ये संतापाचे वातावरण असून संबंधित स्टाफवर वेळीच कारवाई करावी आणि कर्मचाऱ्यांना नीट वागण्याची सूचना द्यावी अन्यथा एकेदिवशी प्रवाशांच्या संतापाचा उद्रेक झाल्यास परिस्थिती चिघळेल, असा इशारा प्रवाशांकडून देण्यात येत आहे.

■ **नेमकं काय झालं ?** - मिळालेल्या माहितीनुसार, काल ( सोमवार) सकाळी कल्याण स्टेशनवर हा प्रकार घडला. स्टेशनट्या सात नंबर प्लॅटफॉर्मवरील स्कायवॉकवर जे तिकीट काऊंटर आहे, तेथे हा वाद आणि मारामारी घडली. पीडित महिला तिकीटाच्या लाईनीत उभी होती. सुट्ट्या पैशांच्या मुद्यावरून तिचे तिकीट काऊंटरवरील स्टाफशी भांडण झाले. बघता बघता त्यांचा वाद वाढला, त्यावेळी त्या प्रवासी महिलेने स्टाफचा व्हिडीओ काढण्यास सुरूवात केली. त्यामुळे ती आणखीनच भडकली आणि तिने त्या महिलेला आत ऑफीसमध्ये बोलावले आणि तिला चक्क मारहाण केली. तिला कानाखाली मारली. ते पाहून इतर प्रवाशांनी मध्यस्थी करत, आरडाओरडा करत त्या महिलेला वाचवण्याचा प्रयत्न केला, मात्र तरीही स्टाफमधील त्या महिला कर्मचाऱ्याने मारहाण सुरूच ठेवली. यामध्ये ती महिला प्रवासी गंभीर जखमी झाली तसेच तिला मोठा मानसिक धक्काही बसला.

■ **प्रवासी आक्रमक** - अखेर इतर प्रवाशांनी स्टाफच्या हातातून कशीबशी त्या महिलेची सुटका केली. तेवढ्यात तेथे रेल्वे पोलिस अधिकारी आले आणि त्यांनी प्रकरण समजून घेत मध्यस्थी केली. तब्बल अर्ध्या तासाच्या गोंधळानंतर रेल्वे पोलिसांच्या मदतीने प्रवासी व तिकीट काउंटरवरील स्टाफचा वाद मिटला. मात्र प्रवाशांना नेहमीच रेल्वे स्टाफकडून अशी वाईट वागणूक मिळते, असा आरोप प्रवाशांकडून करण्यात येत आहे. रेल्वे स्टाफला वेळीच समज द्यावी अन्यथा एखाद दिवस प्रवाशांच्या संतापाचा कडेलोट होईल आणि परिस्थिती हाताबाहेर जाऊन चिघळेल असा इशारा उद्विग्न प्रवाशांनी दिला.


PUBLIC NOTICE

**BEFORE THE COURT OF MEMBER MOTOR CLAIMS TRIBUNAL, THANE AT THANE**

M.A.C.P. M.A. NO. 1304/2023
EXH. NO. 13
N. D. - 10/10/2024

Smt. SAVITA RAVINDRA GARUD & ORS..... Applicants
V/s.
MR. SHREYAS GAWADE .... Opponents
To,
MR. SHREYAS GAWADE
At : G. NO. 832, MEDANKARWADI, CHAKAN
KHED, PUNE - 410501

Whereas the above named applicant has filed Accident Claims Application for the compensation of Rs.100,000/- in the Tribunal against you and others.
You are hereby given notice to appear in the Tribunal in person or by pleader duly instructed and to file your say within. 30 days from the publication of this notice. Failing which the said application will be heard in your absence and determined ex-parte.
Given under my hand and seal on this day of .....

Sign/-
Clerk
M.A.C.T THANE

By Order
Sign/-
Superintendent
Motor Accident Claims Tribunal
Thane



**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

सा. बां. विभाग
निविदा सुचना

ठाणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये ``स्मशानभूमी दुरुस्ती`` या लेखाशिर्षांतर्गत माजिवडा-मानपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील कोलशेत खालचा गाव स्मशानभूमीमधील टॉयलेट ब्लॉक्स् व बर्निंग स्टॅन्डची दुरुस्ती करणे अशा एकुण एक कामाकरीता ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदा प्रक्रीयेमध्ये ज्या निविदाकारांवर शासकीय, निमशासकीय, सार्वजनिक उपक्रम, स्थानिक संस्था, महानगर पालिका ई. मार्फत नोंदणी रद्द करणेबाबत / काळ्या यादीत टाकणेबाबत कार्यवाही करण्यात आली आहे अथवा प्रस्तावीत आहे अशा निविदाकारांना निविदा भरता येणार नाही. निविदा सूचना व निविदा प्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथे दि. ०६/०८/२०२४ ते दि. १३/०८/२०२४ पर्यंत उपलब्ध आहे. ऑनलाईन निविदा संकेतस्थळ येथे दि.१३/०८/२०२४ पर्यंत १६.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. सदर निविदा दि. १४/०८/२०२४ रोजी १६.०० वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधींसमक्ष उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/ सा.बा-मा.मा.प्र.स/२३९/२०२४-२५ सही/-
दि:०५.०८.२०२४
कार्यकारी अभियंता
ठाणे महानगरपालिका, ठाणे

**Pls visit our oficial web-site**
**www.thanecity.gov.in**



सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
(संस्था रजिस्टर कार्यालय)
वेस्ट व्यू बिल्डिंग, राम मारुती रोड, गजानन महाराज मंदिर जवळ, ठाणे (पश्चिम) - ४०० ६०२.

**चौकशी नोटीस**

नोंदणी क्रमांकः ई - ६०१६ / ठाणे
फेरफार बदल क्रमांक: DYCC / ९३३ / २०२४
ट्रस्टचे नाव : शिव ओंकार न्यास
पत्ता : मधुश्री, विष्णुनगर, नौपाडा, ठाणे (पश्चिम) - ४००६०२.

सदर कार्यालयामधे वरील क्रमांकाचा फेरफार बदल १४/०७/२०२४ रोजी दाखल केला असून १७ मे २०२२ रोजी सुनंदा मधुसूदन दाते यांचे दुर्दैवी निधन झाल्याने. त्यांचे नाव कमी करण्यात आले आहे.

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास हरकत घ्यावयची असेल तर त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून तीस दिवसाच्या आत वरील कार्यालयचे पत्त्यावर पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफीयत न आल्यास कोणांस काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पूर्ण केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनीशा सहाय्यक धर्मादाय आयुक्त सार्वजनिकन्यास नोंदणी कार्यालय विभाग ठाणे यांचे सही शिक्यनीशी आज दिनांक ५/८/ २०२४ रोजी दिली आहे.

शिक्का

अधीक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
ठाणे विभाग ठाणे



**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

सार्वजनिक बांधकाम विभाग
निविदा सुचना

ठाणे महानगरपालिका,ठाणे अनुभवी निविदाकारांकडुन "लोकशाहीर अण्णा भाउ साठे-नागरी वस्ती सुधार योजना" **या लेखाशिर्षकांतर्गत** ठा.म.पा प्र.क्रं.१५ मध्ये स्ट्रोम वॉटर ड्रेन व पायवाटांची नागरी सुविधांसाठी कामे **करण्याकरीता खालील** १३(**तेरा**)कामांसाठी ई-टेंडरींग पध्दतीने निविदा मागवित आहे.

| अ.क्र | कामाचे नाव |
|---|---|
| १ | प्र.क्र.१५ केणी नगर येथील परिसरात सभामंडप बांधणे. |
| २ | प्र.क्र.१५ अण्णाभाऊ साठे नगर रोकडे बाई यांच्या घराच्या परिसरात कॉक्रीटीकरण करणे. |
| ३ | प्र.क्र.१५ अण्णाभाऊ साठे नगर रोड नं.२१ परिसरात स्टॅम्प कॉक्रीटीकरण करणे. |
| ४ | प्र.क्र.१५ आंबेवाडी येथील मस्जिद परिसरात स्टॅम्प कॉक्रीटीकरण करणे. |
| ५ | प्र.क्र.१५ जय भवानी नगर उद्यानात नागरीकांना सोई-सुविधा पुरविणे. |
| ६ | प्र.क्र.१५ स्वा. सावरकर नगर येथील सिध्दीविनायक गल्ली परिसरात सुशोभिकरण करणे. |
| ७ | प्र.क्र.१५ स्वा. सावरकर नगर येथील हनुमान मंदिर गल्ली नं.१ व २ परिसरात स्टॅम्प कॉक्रीटीकरण करणे. |
| ८ | प्र.क्र.१५ स्वा. सावरकर नगर येथील ओंकार अपार्टमेंट गल्ली परिसरात स्टॅम्प कॉक्रीटीकरण करणे. |
| ०९ | प्र.क्र.१५ स्वा. सावरकर नगर येथील श्रमसाफल्य अपार्टमेंट गल्ली परिसरात स्टॅम्प कॉक्रीटीकरण करणे. |
| १० | प्र.क्र.१५ स्वा. सावरकर नगर येथील संभाजी गल्ली नं. १,२,३,४ परिसरात कॉक्रीटीकरण करणे. |
| ११ | प्र.क्र.१५ स्वा. सावरकर नगर येथील लक्ष्मी निवास मागील गल्ली (रुपादेवी सोसायटी) गल्ली नं. १ व २ परिसरात स्टॅम्प कॉक्रीटीकरण करणे. |
| १२ | प्र.क्र.१५ स्वा. सावरकर नगर येथील शिवाजी वाडी सुशोभिकरण करणे. |
| १३ | प्र.क्र.१५ स्वा. सावरकर नगर येथील रोड नं.३३ दोन गल्ली पुजारी मॅडम परिसरात कॉक्रीटीकरण करणे. |

ज्या कंत्राटदारांविरुध्द शासकिय/निमशासकिय/सार्वजनिक क्षेत्रातील संस्था व उपक्रम/स्थानिक स्वराज्य संस्था इ.यांनी शिस्त भंगाचे कार्यवाहिच्या अनुषंगाने नोंदणी पत्र रद्द करण्याची कार्यवाही केली/सुरु आहे. अशा कंत्राटदारांना निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार नाही. कामाची सविस्तर निविदा सुचना व निविदा प्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे अधिकृत ई-निविदा संकेतस्थळ https://mahatenders.gov.in/ येथे दि. ०६/०८/२०२४ ते दि. १३/०८/२०२४ रोजी १६.०० वाजेपर्यंत उपलब्ध असतील. सदर निविदा ई-टेंडरींग पध्दतीने दि.१३/०८/२०२४ रोजी १६.०० पर्यंत स्विकारण्यात येतील व शक्य झाल्यास दि. १६/०८/२०२४ रोजी १६.०० वा उपस्थित निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/सा.बा/२४४/२०२४-२५
दि.०५.०८.२०२४

**सही/-**
कार्यकारी अभियंता
ठाणे महानगरपालिका, ठाणे

**Pls visit our oficial web-site**
**www.thanecity.gov.in**



**परिवहन सेवा, ठाणे महानगरपालिका**

निमशासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थेमधून सेवानिवृत्त झालेल्या अधिका-यांची सेवा करार पध्दतीने विवक्षित कामांसाठी घेणेकरीता कंत्राटी जाहिरात.

वाचा : शासन निर्णय क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३ दि.१७ डिसेंबर २०१६

ठाणे महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या आस्थापनेवरील मंजूर व रिक्त परिवहन उप व्यवस्थापक पदासाठी एक वर्षाच्या कालावधीकरीता जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३ दि.१७ डिसेंबर २०१६ अन्वये निमशासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थेमधून सेवानिवृत्त झालेल्या अधिका-यांची सेवा करार पध्दतीने विवक्षित कामांसाठी पात्र व इच्छुक उमेदवारांकडून अर्ज ठाणे महानगरपालिका परिवहन उपक्रमाकडे दि.०६.०८.२०२४ ते दि.२०.०८.२०२४ या कालावधीत कार्यालयीन वेळेपर्यत मागविण्यात येत आहे. अर्जाच्या लिफाफयावर करार पध्दतीने मानधन तत्वावर विवक्षित कामांसाठी अर्ज असे ठळक अक्षरात नमूद करावे. अर्जासोबत स्वत:चा पत्ता असलेला व त्यावर रु.५/- चे पोस्ट मुद्रांक चिकटवेल्या १५ सें.मी. X १० सें.मी. आकाराचा लिफाफा पाठविण्यात यावा. मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

| अ. क्र | पदनाम | वयोमर्यादा | मासिक परिश्रमिक | एकुण जागा | पात्रतेचा निकष |
|---|---|---|---|---|---|
| १ | परिवहन उप व्यवस्थापक | किमान वर्ष -५८ व कमाल वर्ष -६५ | शासन निर्णय क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३ दि.१७ डिसेंबर २०१६ अन्वये देय मासिक पारिश्रमिक (शासन निर्णयातील ड (१) (क) च्या अनुषंगाने) | १ | १) मान्यवर विद्यापीठाचा पदवीधर. २) इंडियन इन्स्टिटयुट, ऑफ रोड ट्रान्सपोर्ट या संस्थेची पदवीका अथवा वाहतुक अधिकारी, सेंट्रल इन्स्टीटयूट ऑफ रोड ट्रान्सपोर्ट पुणे या संस्थेचा शिक्षण संशोधन या विषयाचा अभ्यासक्रम पुर्ण. ३) राज्यमार्ग परिवहन मंडळ अथवा इतर तत्सम परिवहन मंडळामध्ये विभागीय नियंत्रक अथवा तत्सम पदावर काम केल्याचा कमीत कमी ७ वर्षाचा अनुभव. |

सदरचे पद निव्वळ १ वर्षाच्या कालावधीकरिता कंत्राटी पध्दतीने घेण्यात येणार असून पदाचा कार्यकाळ एक वर्षाच्या असेल, आवश्यकतेनुसार मुदतवाढ देण्यात येईल. उक्त पदाचे मासिक परिश्रमिक हे शासन निर्णयामध्ये नमूद परिशिष्ट —अ नुसार अदा करण्यात येईल. तसेच उक्त शासन निर्णयानुसार इच्छुक उमेदवाराची कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी. उमेदवारांनी संदर्भिय शासन निर्णयानुसार अर्ज संपूर्ण माहिती बायोडाटासह/फोटो व आवश्यक प्रमाणपत्र व सेवानिवृत्त आदेशासह (संबंधित कोषागार कार्यालयाचा दाखला व सेवा निवृत्ती पुर्व घेतलेल्या वेतनाचा संबंधित कार्यालयाचा दाखला) अर्जासोबत जोडणे अनिवार्य आहे.

ठामपा/पिआरओ/परिवहन/२४०/२०२४-२५
दि.०५.०८.२०२४

सही/-
परिवहन व्यवस्थापक
परिवहन सेवा,ठा.मपा.ठाणे

**PLS VISIT OUR OFF. WEBSITE**
**www.thanecity.gov.in**



जा.क्र.भिनिशमनपा/संगणक / १५७ / २०२४
दिनांक - २/०८/२०२४

**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**
**भिवंडी, जि. ठाणे**

जाहीर ई निविदा

खालील कामे करण्याकरीता सक्षम व अनुभवी ठेकेदाराकडुन ई निविदा मागविण्यात येत आहे

| ई निविदा क्र / ई निविदा फी/ कामाचे स्वरुप | ई निविदा स्विकारण्याची अंतीम तारीख |
|---|---|
| संगणक / नि.क्र. ४ / २०२४-२५ / रु.१,१८०/- भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका शाळा क्र. ३४, अवचितपाडा या शाळेसाठी डिजीटज शिक्षणासाठी " Futuristic Classroom" (Astronomy Experience Centre) तयार करणेबाबत | दि. २०/०८/२०२४ |

सदर ई निविदा मनपाच्या संकेतस्थळ https:/mahatenders.gov.in वर दि. ०६/०८/२०२४ पासुन उपलब्ध आहेत. आपल्या ई- निविदा वर नमुद केलेल्या तारखेच्या १५.०० वाजे पर्यत पाठविण्यात याव्यात.

मा. प्रशासक तथा आयुक्त सो यांवे मान्यतेने
जा.क्र. /ज.सं.वि/९१८
दि. ०५/०८/२०२४

सही/-
उप आयुक्त (संगणक)
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

दैनिक महाराष्ट्र सम्राट
सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच !



# खड्ड्यामुळे २४ वर्षीय तरुणी ठार

पनवेल: पनवेलमधील रस्त्यात पडलेल्या खड्ड्यांमुळे अनेक अपघातांना दररोज वाहनचालक सामोरे जात आहेत. मात्र रविवारी सायंकाळी पावणेपाच वाजता पळस्पे ते जेएनपीटी या मार्गावरुन दुचाकीने जात असताना २४ वर्षीय तरुणीला स्वत:चा जिव गमवावा लागला आहे. ही तरुणी दुचाकीवरुन तीच्या मित्रासोबत पळस्पे ते जेएनपीटी मार्गावर नांदगाव पुलावरुन जात असताना पुलावर पडलेल्या मोठ्या खड्ड्यामुळे दुचाकीचे चाक आदळल्याने दोघेही दुचाकीवरुन खाली कोसळले. त्याच दरम्यान पाठीमागून येणाऱ्या ट्रेलरच्या चाकाखाली २४ वर्षीय तरुणी ठार झाली. मृत तरुणीचे नाव मानसी रोकडे असे आहे.

मुंबई (भायखळा) घोडपदेव येथील म्हाडा वसाहतीमध्ये राहणाऱ्या मानसी त्यांचा मित्र आदेश लाड यांच्यासोबत माथेरान ते मुंबई असा दुचाकीवरुन प्रवास करुन घरी येत असताना रविवारी हा अपघात झाला. पळस्पे ते जेएनपीटी मार्ग हा काँक्रीटचा बांधला असला तरी त्यावरही ठिकठिकाणी खड्डे आहेत. नांदगाव पुलालगत मोठा खड्ड्यात आदेश चालवित असलेल्या दुचाकीचे चाक आदळल्याने दोघेही रस्त्याच्या उजव्या बाजूला उडवले गेले. या दरम्यान आदेशच्या दुचाकीमागून भरधाव वेगाने ट्रेलर (क्रमांक एमएच ४३,यु. १६७३) येत होता. याच ट्रेलरच्या चाकाखाली मानसीचे शरीर आले. यात मानसीचा चेहरा, मान, पाठ यावर हे भरधाव ट्रेलरचे चाक गेल्याने ती ठार झाली.

वाहनचालक कोणतीही वैद्यकीय मदत न करता तेथून पळून गेला. पनवेल शहर पोलीस ठाण्यात याबाबत ट्रेलरचालकाविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. मात्र रस्त्यातील खड्डे वेळीच बुजविले असते तर मानसीचे प्राण वाचले असते. हा महामार्ग राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारीत येतो. सरकारी प्राधिकरणा विरोधात कोणतीही कारवाई पनवेल शहर पोलीसांकडून केली नसल्याचे पोलीसांकडून सांगण्यात येते. पोलीस ट्रेलरचालकाचा शोध घेत आहेत.

# भाजपच्या बेलापुरात नाईकांचा ‘सांगली पॅटर्न’?



## वाढदिवसानिमित्त संदीप नाईकांचे जोरदार शक्तिप्रदर्शन

नवी मुंबई : महायुतीच्या जागा वाटपात ठाणे लोकसभा मतदारसंघ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पारड्यात गेल्याने एक पाऊल मागे जावे लागलेल्या नवी मुंबईतील गणेश नाईक कुटुंबियांनी आगामी विधानसभा निवडणुकांच्या तोंडावर आत्तापासूनच आक्रमक पवित्रा घेतल्याचे पाहायला मिळत आहे. काहीही झाले तरी ऐरोली आणि बेलापूर या दोन्ही मतदारसंघातून निवडणूक लढवायची असा चंग गणेश नाईक आणि त्यांचे पुत्र माजी आमदार संदीप यांनी बांधला. वेळ आलीच तर लोकसभेचा सांगली पॅटर्न बेलापुरात राबविण्याची तयारी या पिता-पुत्रांनी सुरु केल्याची चर्चा त्यांच्या समर्थकांमध्ये सुरु झाली आहे.

### नाईकांसाठी आर-पारची लढाई ?

*नवी मुंबईपासून थेट मिरा-भाईदरपर्यंत पसरलेल्या जुन्या बेलापूर विधानसभा मतदारसंघावर काही दशके गणेश नाईक यांचे एकहाती वर्चस्व राहिले होते. २००९ मध्ये विधानसभा मतदारसंघांची पुनर्रचना झाल्यानंतर नवी मुंबई शहरात ऐरोली आणि बेलापूर असे दोन स्वतंत्र मतदारसंघ तयार झाले. या निवडणुकांमध्येही नाईक कुटुंबाचे वर्चस्व दिसून आले. २०१४ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या लाटेत मात्र बेलापूर मतदारसंघात गणेश नाईक यांना भाजपच्या उमेदवार मंदा म्हात्रे यांच्याकडून अडीच हजार मतांनी निसटता पराभव सहन करावा लागला. २०१९ मध्ये नाईक भाजपमध्ये गेले आणि त्यानंतर ऐरोली विधानसभेची एकमेव जागा त्यांना देण्यात आली. अनेक दशके नवी मुंबईतील राजकारणावर एकहाती वर्चस्व राखणाऱ्या नाईकांना पहिल्यांदाच दुय्यम भूमिका स्वीकारावी लागली. शहरातील एकमेव जागा मिळाल्याने ऐरोलीचे तत्कालीन आमदार संदीप यांना आपल्या वडिलांसाठी ही जागा सोडावी लागली. यावेळी मात्र काहीही झाले तरी विधानसभा निवडणुकांच्या रिंगणात उतरायचेच असा चंग संदीप यांनी बांधला असून गेल्या महिनाभरापासून बेलापूर मतदारसंघात वेगवेगळ्या कार्यक्रमांचा धडाका त्यांनी लावला आहे.*

बेलापूर मतदारसंघात भाजपच्या मंदा म्हात्रे या विद्यमान आमदार आहेत. या मतदारसंघावर नाईक यांचे लहान पुत्र आणि पक्षाचे नवी मुंबई अध्यक्ष संदीप यांनी दावा सांगितला असून रविवारी झालेल्या त्यांच्या वाढदिवसानिमित्त वाशी ते बेलापूर या उपनगरांमध्ये त्यांच्या समर्थकांनी जोरदार असे शक्तिप्रदर्शन केल्याचे पाहायला मिळाले. एरवी खैरणे एमआयडीसी येथील क्रिस्टल हाऊस येथील कार्यालयात वाढदिवस साजरा करणारे संदीप यांनी यंदा मात्र वाढदिवसाचे ठिकाण सीबीडी बेलापूर येथील पक्षाच्या कार्यालयात हलविले होते. याठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या वेगवेगळ्या कार्यक्रमांमधून संदीप यांचा उल्लेख बेलापूरचे भावी आमदार असाच केला जात होता हे विशेष. सांगली लोकसभेची जागा उद्धव ठाकरे यांच्या पक्षाला सुटल्यानंतर काँग्रेसचे विशाल पाटील यांनी अपक्ष निवडणूक लढवून जिंकली होती. सांगलीत काँग्रेसचे संपूर्ण संघटन विशाल यांच्या विजयासाठी मेहनत घेताना दिसला. बेलापूरमध्ये भाजपने पुन्हा मंदा म्हात्रे यांनाच उमेदवारी दिली तर अपक्ष रिंगणात उतरण्याची तयारी संदीप नाईक यांनी केल्याचे सांगितले जात आहे. भाजपचे शहर अध्यक्ष म्हणून यापूर्वीच संदीप यांनी पक्ष संघटनेवर आपल्या समर्थकांची वर्णी लावली आहे. त्यामुळे अपक्ष म्हणून रिंगणात उतरताना पक्षाचे संघटन आपल्या बाजूने राहील याची पुरेपूर आखणी संदीप यांच्या गोटात केली जात असून बेलापूरचा हा ‘सांगली पॅटर्न’ भाजप श्रेष्ठींसाठीही डोकेदुखी ठरण्याची शक्यता आहे.

बेलापूर मतदारसंघात गेली दहा वर्षे मंदा म्हात्रे या आमदार असून त्यांना तिसऱ्यांदा येथून पक्षाकडून उमेदवारीची अपेक्षा आहे. महायुतीच्या जागा वाटपाच्या गणितात नवी मुंबईतील किमान एक मतदारसंघ तरी आपल्या पक्षाला मिळावा अशी मागणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेतील नेते करत असले तरी भाजपच्या विद्यमान आमदाराची जागा या पक्षाला सहजासहजी मिळणे कठीण दिसते. नवी मुंबईतील दोन्ही जागा भाजपला सुटतील असे चित्र दिसत असले तरी बेलापूरमध्ये या पक्षातच उमेदवारीवरुन जोरदार संघर्ष पहायला मिळत असल्याने हा मतदारसंघ नाईकांसह म्हात्रे यांच्यासाठीही प्रतिष्ठेचा ठरु लागला आहे.



श्रावणी सोमवार निमित्त ठाण्यातील प्राचीन कोपिनेश्वर मंदिरात फुलांची सुंदर सजावट करण्यात आली होती.आ. निरंजन डावखरे यांनी फुलांची वाडी करून श्री शंकराचे दर्शन घेऊन अभिषेक केला. यावेळी भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. (छाया : मनोज सिंह)

# ९ लाखांचा २३ किलो गांजा जप्त

नवी मुंबई: गांजा विक्रीप्रकरणी नवी मुंबई पोलिसांनी दोन आरोपींना अटक केले आहे. त्यांच्याकडून ९ लाख ४५ हजार रुपयांचा २३ किलो ६२५ गांजा जप्त केला आहे. या प्रकरणी दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. वाजिद अब्दुल लतीफ खान आणि निहाल गागट असे अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. शीव पनवेल महामार्गावर सानपाडा स्टेशननजीक असणाऱ्या एनएमएमटी बस स्थानकावर दोन युवक गांजा विक्रीस येणार असल्याची माहिती अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नीरज चौधरी यांना मिळाली होती. या माहितीच्या आधारावर सापळा लावून दोन्ही आरोपींना ताब्यात घेतले. त्यांची अंगझडती केली असता गांजा आढळून आला. त्याचे वजन केले असता २३ किलो ६२५ ग्रॅम भरले. ज्याचे मूल्य ९ लाख ४५ हजार आहे. सदर आरोपींना अटक करण्यात आले असून गांजा कोणाला देण्यात येणार होता आणि कुठून आणला होता याचा तपास सुरु आहे.

# कल्याणमध्ये नोकरदार तरूणीचा विनयभंग

कल्याण : मागील महिनाभर कल्याण मधील एका २४ वर्षीय नोकरदार तरूणीचा पाठलाग करून, तू माझ्यावर प्रेम कर. तू माझ्यावरील प्रेमाला नकार दिला तर मी तुला मारून टाकीन, अशी धमकी देणाऱ्या, तसेच या तरूणीचा विनयभंग करणाऱ्या मोहसिन शेख (२४) या तरूणाविरूध्द पीडित तरूणीच्या तक्रारीवरून खडकपाडा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

पीडित तरूणी कल्याण पश्चिमेत राहते. त्याच भागातील एका व्यापारी संकुलात ती नोकरी करते. आरोपी मोहसिन शेख हा कल्याण मधील सिंधीगेट भागात राहतो. नॉन फूड व्हर्टेक्स व्हॉट्सप ग्रुपमधून प्राप्त झालेल्या मोबाईल क्रमांकावरून पीडित तरूणी आणि आरोपी तरूण मोहसिन यांची ओळख झाली होती. गेल्या महिनाभर आरोपी मोहसिन पीडितेचा पाठलाग करून तिला प्रेमाची गळ घालत होता. पण पीडिता त्याला दात देत नव्हती. पोलिसांनी सांगितले, आरोपी तरूण मोहसिन आणि पीडित तरूणी यांची व्हॉट्सप ग्रुपच्या माध्यमातून ओळख झाली होती. या परिचयातून मोहसिन याने पीडितेचा विश्वास संपादन केला होता.

# वन्य प्राणी रुग्णालय आणि पुनर्वसन केंद्रासाठी १०० कोटींचा निधी देण्यात येईल

## खा. डॉ.श्रीकांत शिंदे यांचे आश्वासन



**कल्याण : डायघर येथे महाराष्ट्र शासनाच्या वन विभागातर्फे नव्याने सुरु करण्यात आलेल्या वन्यप्राणी रूग्णालय तथा पुनर्वसन केंद्राचे कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ.श्रीकांत एकनाथ शिंदे यांच्या हस्ते याचे शनिवारी लोकार्पण करण्यात आले. यामुळे उपचारानंतर पूर्णपणे बरे होण्यासाठी प्राण्यांना एक सुरक्षित निवारा देखील उपलब्ध झाला आहे. तर या ठिकाणी देशातील उत्तम दर्जाचे असे स्टेट ऑफ आर्ट असलेले प्राणिसंग्रहालय, बचाव आणि पुनर्वसन केंद्राची उभारणी करण्यात यावी. यासाठी सविस्तर प्रकल्प आराखडा तयार करून तो लवकरात लवकर सादर करावा. यासाठी गरज पडल्यास १०० कोटी रुपयांच्या भरीव निधीची तरतुद केंद्र, राज्य सरकार तसेच जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून तातडीने करण्यात येईल. असे आश्वासन खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांनी यावेळी उपस्थितांशी संवाद साधताना दिले.**

कल्याण येथील डायघर येथे महाराष्ट्र शासनाच्या वन विभागातर्फे वन्यप्राणी रूग्णालय तथा पुनर्वसन केंद्र उभारण्यात आले आहे. या केंद्रात वन्यप्राण्यांवर उपचार करण्यासाठी सर्व आवश्यक सोयीसुविधा उभारण्यात आले आहे. तसेच जखमी प्राण्यांच्या शस्त्रक्रियेसाठी देखील सुविधा या ठिकाणी उभारण्यात आल्या आहेत. वाहनांच्या धडकेत, नैसर्गिक आपत्तीमुळे, विजेचा झटका लागून तसेच काही संरक्षित वन क्षेत्रात घुसखोरी करून वन्य प्राण्यांना तसेच पक्षांना इजा करणाऱ्या काही समाज कंटकांमुळे वन्य जीव अनेकदा जखमी होत असल्याचे निदर्शनास येत असते. या प्राण्यांना तातडीने उपचार न मिळाल्यास त्यांचा मृत्यू देखील येतो तर काही वन्य प्राण्यांना कायमचे अपंगत्व येते. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाच्या वन विभागातर्फे वन्यप्राणी रूग्णालय तथा पुनर्वसन केंद्र उभारण्यात आले आहे. या केंद्रामुळे केवळ कल्याण, डोंबिवली येथीलच नव्हे तर संपूर्ण ठाणे जिल्ह्यातील वन्य प्राण्यांवर उपचार करणे सुकर होणार आहे. तसेच या ठिकाणी उपचारानंतर प्राण्यांना सुरक्षित पद्धतीने ठेवण्यासाठी पिंजऱ्यांची देखील उभारणी करण्यात आली आहे. यामुळे उपचारानंतर पूर्णपणे बरे होण्यासाठी प्राण्यांना एक सुरक्षित निवारा देखील उपलब्ध झाला आहे. तर शहरात आढळून येणाऱ्या बिबट्याना जेरबंद करून त्यांना सुरक्षित मिळेपर्यंत काही काळ या केंद्रात ठेवण्यासाठी विशेष पिंजरे देखील या केंद्रात उभारण्यात आले आहे. तसेच शस्त्रक्रियेसाठी आणि उपचारांसाठी आधुनिक यंत्रसामग्री, प्रशिक्षित वैद्यकीय कमर्चारी डॉक्टर यांची नियुक्ती या ठिकाणी करण्यात आली आहे. यामुळे उपचारानंतर पूर्णपणे बरे होण्यासाठी प्राण्यांना एक सुरक्षित निवारा देखील उपलब्ध झाला आहे. कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे यांच्या हस्ते याचे शनिवारी लोकार्पण करण्यात आले. या केंद्राच्या लोकार्पणानंतर सर्व प्राणीप्रेमी कडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. यावेळी शिवसेना जिल्हा प्रमुख गोपाळ लांडगे, उपजिल्हा प्रमुख राजेश कदम, डोंबिवली शहरप्रमुख राजेश मोरे, दिवा शहरप्रमुख रमाकांत मढवी, मुंब्रा शहरप्रमुख राजन किणे, कल्याण ग्रामीण तालुकाप्रमुख महेश पाटील, आगरी युथ फोरमचे अध्यक्ष गुलाब वझे, बंडू पाटील, हनुमान ठोंबरे यांच्यासह ठाणे मुख्य वनसंरक्षक के. प्रदीपा, सहायक वनसंरक्षक सोनल वळवी, उप वनसंरक्षक संतोष सस्ते, वनपरिक्षेत्र अधिकारी दिनेश देसले तसेच नव्याने सुरु करण्यात आलेल्या रुग्णालयाचे डॉ. मंदार गावकर यांच्यासह शिवसेनेचे स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि विविध मान्यवर मंडळी उपस्थित होते.

मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त यांच्या नावीन्यपूर्ण संकल्पनेतून

# शहराच्या भवितव्यासाठी सीएसआर कॉन्क्लेव्हचे आयोजन

भाईंदर : मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या नावीन्यपूर्ण संकल्पनेतून मिरा भाईंदर शहराचा मूलभूत विकास व्हावा याकरिता व सन २०४७ पर्यंत शहराचा अत्याधुनिकरित्या कायापालट व्हावा या दृष्टिकोनातून CSR कॉन्क्लेव्ह : Transforming Mira Bhayandar२०४७ चे आयोजन भारतरत्न गानसम्राज्ञी लता मंगेशकर नाट्यगृह सभागृह येथे करण्यात आले आहे. असा नावीन्यपूर्ण उपक्रम राबवणारी मिरा भाईंदर महानगरपालिका ही देशातील पहिली महापालिका ठरली आहे.

या उडठ कॉन्क्लेव्हचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे शहरातील विकासक व संस्था यांच्याशी होणाऱ्या संवादातून प्रभावी उपक्रम राबविणे आणि मिरा भाईंदर शहराच्या भविष्याला आकार देण्यासाठी डायनॅमिक प्लॅटफॉर्म म्हणून काम करण्याचा आहे. सीएसआर उपक्रम राबवू इच्छिणाऱ्या सर्व कॉर्पोरेट्स आणि विकास प्रकल्पांवर काम करण्यास उत्सुक असलेल्या सर्व संस्थांसाठी महापालिकेचे दरवाजे खुले आहेत. या CSR कॉंक्लेव्ह मध्ये महापालिका पर्यावरण, शिक्षण आणि आरोग्य सेवा या मुख्य तीन विषयांवर लक्ष केंद्रीत करण्यात येणार आहे. विचारवंत नेते, उद्योग तज्ञ आणि सरकारी अधिकारी शिक्षण, पर्यावरण आणि आरोग्य सेवा या क्षेत्रातील जागतिक आव्हाने आणि नाविन्यपूर्ण उपायांवर चर्चा करणार आहेत. शैक्षणिक पायाभूत सुविधा वाढवणे, डिजिटल साधने सादर करणे आणि वय १८ पर्यंत रोजगारक्षमता सुनिश्चित करण्यासाठी व्यावसायिक प्रशिक्षणाला प्रोत्साहन देण्यात येणार आहे. पर्यावरणीय शाश्वतता आणि वर्तुळाकार अर्थव्यवस्था, टिकाऊ शहरी परिसंस्थेला प्रोत्साहन देण्यासाठी कचरा व्यवस्थापन, प्रदूषण नियंत्रण आणि हिरव्या जागांचा विस्तार करणे याबाबत चर्चा करण्यात येणार आहे. आरोग्यसेवा पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करणे, वैद्यकीय उपकरणांचा प्रवेश सुनिश्चित करणे आणि मजबूत प्राथमिक आरोग्य सेवा प्रणाली स्थापित करून शहरातील नागरिकांसाठी सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याचा मानस आहे.



NITI आयोग सदर कार्यक्रमासाठी धोरणात्मक मार्गदर्शन आणि समर्थन प्रदान करणार आहे. सामाजिक संस्था, विकासक, अन्य संस्था व शहरातील नागरिकांनी या उपक्रमात जास्तीत जास्त सहभाग नोंदवून मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान देण्याचे आवाहन आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यां च्या वतीने करण्यात येत आहे.




शिवसेना वागळे विभाग आणि संकल्प प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित १० वी व १२ वी च्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आणि मार्गदर्शन सोहळा विधानसभेच्या उपसभापती डॉ. नीलम ताई गोऱ्हे यांच्या प्रमुख उपस्थितीत ठाण्यातील किसन नगर येथील मैदानावर मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात संपन्न झाला. याप्रसंगी नगरसेविका तथा कार्यक्रमाच्या आयोजिका जयश्री फाटक, मार्गदर्शक डॉ. अभिजीत पांचाळ, नगरसेवक राम रेपाळे, नगरसेवक दीपक वेतकर, विभागप्रमुख संजय भोसले यांसह पदाधिकारी, कार्यकर्ते, विद्यार्थी, पालक व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ठाणे जिल्ह्याची चौफेर कोंडी

## वसई फाट्यावर ट्रक उलटल्याने १५ तास वाहतूक ठप्प

ठाणे, वसई : ठाणे जिल्ह्यात पावसाचा जोर शनिवारी दिवसभर कायम असतानाच, पहाटे ३ वाजता मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील वसई फाट्याजवळ हायड्रोजन सिलिंडर वाहून नेणारा ट्रक उलटल्याने या मार्गावरील वाहतूक ठप्प झाली. मुंबई व गुजरात या दोन्ही मार्गिकांवर ८ ते १० किलोमीटर रांगा लागल्या होत्या. घोडबंदर मार्गे वसईच्या दिशेने जाणारी वाहतूक मुंबई-नाशिक आणि जुना मुंबई-आग्रा मार्गावरून वळविण्यात आल्याने या मार्गांवर भार वाढून कोंडी झाली. अखेर वाहतुकीसाठी बंद असलेल्या घोडबंदर मार्गावर वाहने सोडून ती फाऊंटेन हॉटेल ते गायमुख घाट परिसरात रोखून धरण्यात आल्याने त्याचा फटका शहरातील अंतर्गत मार्गांनाही बसला.

वसई फाट्याजवळील अपघातात सिलिंडर गळती होऊ नये म्हणून खबरदारी घेण्यात येत होती. उरण येथील जेएनपीटी बंदरातून घोडबंदर मार्गे गुजरातच्या दिशेने जाणारी वाहतूकही ठप्प झाली. या मार्गावरील वाहतूक मुंबई-नाशिक महामार्ग आणि मुंबई-आग्रा महामार्ग येथून भिवंडी मार्गे गुजरातच्या दिशेने वळविण्यात आली. कशेळी,काल्हेर, अंजुरफाटा, कोपर या अंतर्गत मार्गांवर वाहनांचा भार वाढून कोंडी झाली. शिवाय, ठाण्यातून जाणाऱ्या मुंबई-नाशिक मार्गावरील तीन हात नाका, नितीन कंपनी, कॅडबरी, माजिवाडा, कापूरबावडी या भागात वाहतूक कोंडी झाली होती. माजिवडा भागात ट्रक बंद पडल्याने कोंडीत भर पडली. वाहतूक कोंडी वाढू लागताच वाहतूक पोलिसांनी अवजड वाहतुकीसाठी बंद असलेल्या घोडबंदर मार्गावरून अवजड वाहने सोडण्यास सुरुवात केली. ही वाहने पुढे फाऊंटेन हॉटेल ते गायमुख घाट येथे एका मार्गिकेवर रोखून ठेवण्यात आली. या वाहनांच्या रांगा कापूरबावडीपर्यंत आल्याने त्याचा फटका शहरातील अंतर्गत रस्त्यावरील वाहतुकीला बसला.

# बुध्दीबळाचा पट आणि सोंगट्यांमधून कचरा वर्गीकरणाच्या संदेशाचे हसत खेळत प्रसारण

नवी मुंबई : ‘निश्चय केला, नंबर पहिला’ हे ध्येय नजरेसमोर ठेवून ‘स्वच्छ सर्वेक्षण २०२३’ मध्ये देशातील व्दितीय क्रमांकाच्या स्वच्छ शहराचा नावलौकिक ‘स्वच्छ सर्वे क्षण २०२४’ मध्ये उंचावण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या उपक्रमांत महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार लोकसहभागावर भर देण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे शहराचे भविष्य असणाऱ्या लहान मुलांच्या मनावर आत्तापासूनच स्वच्छतेचा संस्कार करण्यासाठी विद्यार्थ्यांना आवडणाऱ्या गोष्टींमधून शालेय स्तरावर स्वच्छतेचे महत्व त्यांच्या मनावर हसत खेळत बिंबविण्यात येत आहे.

अशाच प्रकारचा एक अभिनव उपक्रम नमुंमपा स्तरावरील शाळांच्या ८ केंद्रांमध्ये राबविण्यात आला. यामध्ये



विद्यार्थ्यांच्या आवडत्या बुध्दीबळ खेळाचे आयोजन करण्यात आले होते. नेरूळ, शिरवणे, वाशी, घणसोली, कोपरखैरणे ३१ व ३८, ऐरोली, तुर्भे अशा ८ केंद्रावर राबविण्यात आलेल्या बुध्दिबळ खेळाचे आयोजन वेगळ्या पध्दतीने करण्यात आले.

सर्वसाधारणपणे बुध्दीबळामध्ये पटावर काळे आणि पांढरे चौकोन असतात, तसेच सोंगट्याही काळ्या व पांढऱ्या रंगात असतात. तथापि स्वच्छतेच्या बुध्दीबळाचा हा पट त्यापेक्षा काहीसा वेगळा नाविन्यपूर्ण होता. म्हणजे या चौकटी घरगुती घातक कचऱ्याचे प्रतिक म्हणून काळ्या रंगाच्या डब्यासारख्या काळ्या रंगाच्या चौकटीने तसेच सॅनिटरी कचऱ्याचे प्रतिक म्हणून लाल रंगाच्या डब्यासारख्या लाल रंगाच्या चौकटीने रंगविलेल्या होत्या. त्याचप्रमाणे त्यावरील सोंगट्याही ओल्या कचऱ्याच्या डब्याचे प्रतिक म्हणून हिरव्या रंगाच्या आणि सुक्या कचऱ्याच्या डब्याचे प्रतिक म्हणून लाल रंगाच्या होत्या.

याप्रसंगी घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ.अजय गडदे, शिक्षण विभागाच्या उपआयुक्त श्रीम. संघरत्ना खिल्लारे, शिक्षणाधिकारी श्रीम. अरूणा यादव व इतर अधिकारी यांनी उपस्थित राहून विदयार्थ्यांना प्रोत्साहन व मार्गदर्शन केले.

महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या संकल्पनेतून, अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार व शिरीष आरदवाड यांच्या मार्गदर्शनाखाली, स्वच्छता बुध्दीबळ खेळाचे घनकचरा व्यवस्थापन, शिक्षण व क्रीडा या तिन्ही विभागांच्या संयुक्त सहयोगाने आयोजन करण्यात आले होते. या अभिनव पध्दतीने आयोजित करण्यात आलेल्या स्वच्छता बुध्दीबळ उपक्रमाच्या वेगळेपणामुळे विद्यार्थ्यांमध्ये खेळण्यासाठी तसेच बघण्यासाठीही कमालीची उत्सुकता होती.

## भिवंडीत आंदोलन

गेल्या काही दिवसांपासून भिवंडी ग्रामीण म्हणजेच कशेळी-काल्हेर भागातून जाणाऱ्या जुन्या मुंबई-आग्रा महामार्गावर वाहतूक कोंडी होत आहे. या भागात मोठी गोदामे असून तेथील रस्त्यांवर खड्डे आहेत. यामुळे वाहतूक संथगतीने होऊन कोंडी होते. यामुळे संतप्त झालेले पालक, शिक्षकासह विद्यार्थ्यांनी कोपर भागातील रस्त्यावर शुक्रवारी सायंकाळी ठिय्या मांडला. वाहतूक पोलिसांनी भेट घेऊन समजूत काढल्यानंतर पालक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी आंदोलन मागे घेतले आणि या मार्गावरील वाहतूक सुरू झाली.

## जिल्ह्यात पावसाचा जोर वाढला

ठाणे जिल्ह्यात शनिवारी सकाळपासून सोसाट्याच्या वाऱ्यासह मुसळधार पाऊस सुरू होता. ठाणे, डोंबिवली, कल्याण, उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर, भिवंडी शहरासह इतर शहरांमध्ये सखल भागात पाणी साचले होते. ठाणे शहरात सकाळी ८.३० ते दुपारी ५.३० या कालावधीत ७८.४६ मिमी पाऊस झाला. पावसादरम्यान, तुळशीधाम भागातील धर्मवीर नगर परिसरात असलेला लोखंडी बस थांबा पडला. दोन ठिकाणी वृक्ष उन्मळून पडले. अंबरनाथ, उल्हासनगर तसेच बदलापूर शहरात शनिवार सकाळपासूनच पावसाची संततधार सुरू होती. दुपारी तिन्ही शहरांमध्ये पावसाचा जोर वाढला.





शेअर रिक्षा चालकांनी सोमवारी बंद पुकारल्याने सकाळी कामावर जाणाऱ्या नागरिकांचे चांगलेच हाल झाले यावेळी गोखले रोडवर नागरिक मोठ्या प्रमाणात रस्त्यावर आले होते. (छाया : मनोज सिंह)

# ठाकुर्ली-कल्याण दरम्यान ओव्हरहेड वायर तुटली, मध्य रेल्वेचा खोळंबा

**कल्याण : ठाकुर्ली आणि कल्याण दरम्यान ओव्हरहेड वायर तुटल्याने खोळंबा झाला आहे आणि ही वाहतूक विस्कळीत झाली आहे. ओव्हरहेड वायर तुटून ट्रॅकवर पडल्याने मोठा स्फोट झाल्यासारखा आवाज आला आणि लोकल जागच्या जागी थांबल्याची घटना सोमवारी डोंबिवली ठाकुर्ली रेल्वे मार्गावर घडली. दुपारी पावणे तीनच्या सुमारास हा अपघात झाला, सुदैवाने त्यात कोणतीही जीवितहानी झाली नसल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.**

## मध्य रेल्वे मार्गावर पहिल्याच दिवशी खोळंबा

*मध्य रेल्वेच्या प्रवाशांना आठवड्याच्या पहिल्याच दिवशी मोठ्या मनस्तापाला सामोरे जावं लागचं आहे. ठाकुर्ली आणि कल्याण रेल्वे स्थानकादरम्यान ओव्हरहेड वायर तुटल्याने मध्य रेल्वेची वाहतूक विस्कळीत झाली आहे. कर्जत आणि कसाऱ्याच्या दिशेने जाणारी वाहतूक विस्कळीत झाली आहे. मुंबई ट्रेन अपडेट्स या ग्रुपने ही माहिती दिली आहे. ओव्हरहेड वायर तुटल्याची माहिती मिळाल्यानंतर रेल्वेचे कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले आहेत. ओव्हरहेड वायर दुरुस्तीचे काम सुरू असून लवकरच वाहतूक सुरळीत होईल रेल्वे प्रशासनाकडून सांगण्यात आलं आहे.*

## प्रवासी चालत निघाले आणि रस्त्यावर आले

*दुपारची वेळ असल्याने लोकलमध्ये प्रवाशांची संख्या कमी होती. ठाकुर्ली रेल्वे स्थानकापासून कचोरे गावदेवी मंदिरा दरम्यान लोकल बंद पडल्याने प्रवाशांनी चालत ठाकुर्ली रेल्वे स्थानक गाठले. तर काही प्रवाशांनी ९० फुटी रस्त्यावर जाऊन तेथून रिक्षेने कल्याणला जाण्याचा पर्याय निवडला. कल्याणकडे जाणाऱ्या धिम्या मार्गात बदलापूर लोकल ओव्हरहेड तुटल्याने खोळंबून राहिली होती. त्यामुळे या लोकलच्या पाठोपाठ धावणाऱ्या कल्याणकडे जाणाऱ्या कल्याण, टिटवाळा, कसारा, कसारा, अंबरनाथ, कर्जत, खोपोली लोकल ठाकुर्ली, डोंबिवली, कोपर, दिवा भागात जागोजागी खोळंबून राहिल्या. दिवा परिसरात कर्जतकडे जाणाऱ्या एक्सप्रेस खोळंबून राहिल्या.*

### ओव्हरहेड वायर तुटताना मोठा आवाज झाला

ओव्हरहेड वायर तुटताना मोठा आवाज आणि परिसरात धूर पसरला. केबल जळल्याचा वास सुटल्याने प्रवाशांना सुरूवातीला लोकलला आग लागल्याची जाणीव झाली. त्यामुळे घाईने प्रवाशांनी लोकलमधून उड्या मारल्या. बदलापूर लोकलच्या ठाकुर्ली बाजूकडील तिसऱ्या डब्याजवळील ओव्हरहेड वायर तुटली. मागील काही दिवसांपासून ठाकुर्ली जवळ लोकल, एक्सप्रेस इंजिन बंद पडण्याचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे रेल्वे प्रवासी नाराजी व्यक्त करत आहेत.

### ठाकुर्ली स्थानकावर झाली गर्दी

बदलापूर लोकल मधील प्रवासी, त्याच्या पाठोपाठ खोळंबलेल्या लोकलमधील गर्दी एकाचवेळी ठाकुर्ली रेल्वे स्थानकात झाली. त्यामुळे हे स्थानक गर्दीने तुंडूब भरले होते. रेल्वे सुरक्षा दलाचे जवान रेल्वे स्थानकात चेंगराचेंगरी होणार नाही याची काळजी घेत होते. रेल्वे मार्गातून पायी चालत येणाऱ्या प्रवाशांना जवान सुरक्षितपणे स्थानकाकडे येण्याच्या सूचना करत होते. ठाकुर्लीजवळ लोकल बंद पडल्याची माहिती मिळताच डोंबिवली, ठाकुर्ली भागातील रिक्षा चालकांनी ठाकुर्ली रेल्वे स्थानक भागात रिक्षा नेऊन प्रवाशांना आवश्यक ते भाडे घेऊन कल्याण, डोंबिवली परिसरात पोहचवले. ९० फुटी रस्त्यावरून कल्याणकडे जाणाऱ्या प्रवाशांची संख्या सर्वाधिक होती.

मुंबई पालिकेने सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना

# पाच वर्षांसाठी मंडप परवानगी द्यावी : लोढा

मुंबइ : सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने गत १० वर्षात नियमांचे उल्लंघन केले नसल्यास अशा मंडळांना महानगरपालिकेने पाच वर्षाचे मंडप परवाने अटी शर्तींविना देण्यात यावे, असे निर्देश मुंबई उपनगरचे पालकमंत्री मंगल प्रभात लोढा यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

मंत्रालयात सन २०२४ च्या बृहन्मुंबई सार्वजनिक गणेशोत्सव समितीची बैठक आज पार पडली. यावेळी बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या विविध अडीअडचणीसंदर्भात समन्वय समितीसोबत चर्चा करण्यात आली. बैठकीला बृहन्मुंबई महानगरपालिका सार्वजनिक गणेशोत्सव समितीचे अध्यक्ष ड. नरेश दहिबावकर, सचिव गिरीश वालावलकर, गणेश गुप्ता, अरूणा हळदणकर, भूषण कडू, संजय शिर्के,राजू वर्तक, जलसुरक्षा दल गोराईचे अनिरूद्ध जोशी, दादरचे जलसुरक्षा दलचे सुरज वालावलकर,गिरगावचे रूपेश कोठारी यावेळी उपस्थित होते.

पालकमंत्री लोढा म्हणाले की, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने मागील दहा वर्षात कायदेशीर व नियमांचे उल्लंघन केलेले नसेल अशा मंडळाना सरसकट पाच वर्षाचे मंडप परवाने देण्याचे महानगरपालिकेने जाहीर केले आहे. यामध्ये काही अटी व शर्ती घातलेल्या आहेत. समन्वय समितीच्या मागणीनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेने सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना कोणत्याही अटी व शर्ती न टाकता प्रत्येक मंडळाला सरसकट पाच वर्षासाठी परवानगी द्यावी.

पालकमंत्री लोढा म्हणाले की, गेल्यावर्षी रामलीला उत्सवासाठी महानगरपालिकेच्या मैदानात उभारण्यात येणाऱ्या मंडपाच्या भाड्यामध्ये ५० टक्के सवलत व निःशुल्क अग्निशमन सेवा देण्यात आली होती. त्याच धर्तीवर यंदाही गणेशोत्सव साजरा करण्यासाठी गणेशोत्सव मंडळांना ही सवलत देण्यात यावी. मुंबईमधील १० वर्षे व त्यापेक्षा जुन्या गणेश मंडळाचे तसेच बृहन्मुंबई सार्वजनिक गणेशोत्सव समन्वय समितीचे कार्यालय यांना महानगरपालिकेकडून मालमत्ता (करारामध्ये टॅक्स) ५० टक्के सवलत देण्यात यावी, अशाही सूचना पालकमंत्री लोढा यांनी केल्या.

## 'सेफ वेब फॉर चिल्ड्रन' कार्यक्रमाचे आज उद्घाटन

मुंबई: राज्य बाल हक्क संरक्षण आयोग मुलांचे ऑनलाईन लैंगिक शोषण आणि अत्याचार विरुद्ध लढा या उपक्रमांतर्गत सेफ वेब फॉर चिल्ड्रन हा कार्यक्रम राबवित आहे. या कार्यक्रमाचा प्रारंभ उद्या ६ ऑगस्ट २०२४ रोजी दुपारी ४ वाजता, सह्याद्री अतिथीगृह, मलबार हिल येथे होणार आहे. महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग व चाईल्ड फंड इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने मुलांच्या हक्कांचे संरक्षण आणि मुलांचे ऑनलाईन लैंगिक शोषण व गैरवर्तन यापासून संरक्षण करणे या उद्देशाने मुलांसाठी ऑनलाईन सुरक्षिततेचा उपक्रम राज्यात राबविण्यात येणार आहे. या उद्घाटन सोहळ्यास महिला व बालविकास विभाग मंत्री आदिती तटकरे आणि शालेय शिक्षण विभागाचे मंत्री दीपक केसरकर हे प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत.

ऑनलाईन लैंगिक शोषणासंबंधी राज्यातील सर्व वयोगटातील मुले व सर्वसामान्यांमध्ये जनजागृती व्हावी आणि प्रचार, प्रसार, व्हावा यासाठी जिल्हास्तरावर हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. असे राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या अध्यक्षा अॅड. सुशीबेन शाह यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.







'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर – डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई – ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम – ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक – चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१